# लम्पी त्वचा रोगापासून आपले पशुधन वाचवा

कु. फाल्गुनी खडसे
आचार्य पदवी विद्यार्थिनी (पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग)

डॉ. राजेश्वर शेळके
सहयोगी प्राध्यापक (पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग)

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

लम्पी हा एक त्वचा रोग सध्या महाराष्ट्रात भरपूर प्रमाणात आढळून येतोय. या रोगाचा जर इतिहास पहिला तर १०० वर्षांपूर्वी म्हणजे जवळपास १९२९ ला दक्षिण आफ्रिकेमध्ये या रोगाचा शोध लागला. आणि तदनंतर साधारणत: २०१२-२०१३ पर्यंत हा रोग विदेशातच होता. मात्र २०१२-२०१३ नंतर हा रोग आफ्रिकेमधून युरोप खंडात आणि युरोपातून आशिया आणि २०२२ मध्ये ओरीसा मध्ये पहिल्यांदा या रोगाची नोंद झाली आणि गेल्या काही वर्षांपासून हा रोग आपल्या देशामध्ये सर्वत्र पसरतोय. ओरीसा नंतर तेलंगणा, झारखंड, केरळ, तमिळनाडू, कर्नाटकमध्ये या रोगाची साथ पसरली. महाराष्ट्रामध्ये या रोगाची सुरुवात गडचिरोली जिल्ह्यामध्ये मार्च महिन्यामध्ये झाली होती. एप्रिलमध्ये हा रोग मराठवाड्यामध्ये पण आढळून आला आणि तदनंतर हा रोग पावसाळ्याच्या काळामध्ये सर्वत्र हळुवार पसरत गेला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाल आहे.



लम्पी स्कीन हा एक विषाणुजन्य असा रोग आहे. या रोगाचा संसर्ग कॅप्रिपॉक्स (capripox) विषाणुमुळे होतो. गाय व म्हैस वर्गात हा आजार आढळतो. सर्व वयोगटातील पशुंना प्रादुर्भाव होतो. पण लहान वयाच्या पशुंमध्ये आजाराची लक्षणे आणि तीव्रता जास्त दिसून येते. जनावरे बाधित होण्याचे प्रमाण १० ते २० % आहे आणि मृत्युदर १ ते ५ % आहे. विदेशी आणि संकरीत प्रजातीच्या पशुंमध्ये आजाराची तीव्रता जास्त असते. शेळ्या-मेंढ्यात हा आजार होत नाही. तसेच मानवाला या रोगाचा संसर्ग होत नाही. उष्ण व दमट हवामान रोगप्रसार होण्यास पोषक.

## रोगप्रसार:

डास, चावणाऱ्या माश्या, गोचीड, चिलटे, बाधित जनावराचा स्पर्श, दुषित चारा-पाणी

## लक्षणे:

शरीरावर ठळकपणे दिसणाऱ्या गाठी (१० ते २० मि.मी. व्यास). ताप येणे. डोळ्यातून व नाकातून पाणी व चिकट स्त्राव. लाळ ग्रंथींना सूज. पायावर सुज आणि लंगडणे. दुध उत्पादनात घट. कमी प्रमाणात चारा-पाणी यांचे सेवन करणे. रवंथ करताना त्रास होणे. फुफ्फुसदाह, कासदाह होतो.

## प्रतिबंधात्मक उपाय:

- बाधित जनावरांना वेगळ्या गोठ्यात ठेवणे.
- साधारण ताप, अंगावर गाठी दिसून आल्यास पशुधनास वेगळे ठेवून निरीक्षण करावे.
- बाह्य कीटकांचे नियंत्रण करावे.
- गोठा आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा.
- मृत पशु खोल खड्यात पुरून योग्य विल्हेवाट लावावी आणि त्यावर चुना टाकावा.
- बाधित पशुंच्या उपचारासाठी वापरलेले साहित्य, सुई, इंजेक्शन इ. नष्ट करावे. व त्याचा पुनर्वापर करू नये.
- आजारी जनावराचे दूध वासरांना पाजू नये
- बाधित जनावरांचे कच्चे दूध सेवन करू नये.
- रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी जीवनसत्व, लिव्हर टॉनिक,क्षार मिश्रण द्यावे.
- त्वचेवरील जखमेसाठी जंतूनाशक मलम/ स्प्रे वापरावा.
- बाधित वळूचे वीर्य कृत्रीम रेतनासाठी अथवा प्रजननासाठी वापरू नये.
- बाधित परिसरात स्वच्छता व निर्जंतुक द्रावणाची फवारणी करावी. त्याकरिता १ % फोर्मलीन किंवा २-३ % सोडिअम हायपोक्लोराईट, फिनोल २४ यांचा वापर करावा.
- नागीलीची पाने, काळी मीरी, मिठाचे मिश्रण करून गुळातून दिवसातून दोनदा आठवड्यातून पाजावे.
- गोठ्यात दररोज कडुनिंबाच्या पानांचा धूर केल्यास व कीटकनाशकांची फवारणी केल्यास त्या ठिकाणी कीटक प्रवेश करत नाहीत.
- पशुंचा सांभाळ करणारे व्यक्ती, पशुपालक, पशुवैद्यक, रोग नमुने गोळा करणारे व्यक्ती यांनी ग्लोव्हज, मास्क वापरावे.
- निरोगी पशुमध्ये लसीकरण पशुवैद्यकाच्या सहाय्याने करावे. बाधित पशुमध्ये लसीकरण करू नये.
- या रोगाने ग्रस्त जनावरांचा मृत्यू झाल्यास मृतदेह शास्त्रीय पद्धतीने कमीत कमी ८ फूट खोल खड्यात गाडून विल्हेवाट लावताना मृत जनावरांच्या खाली व वर चुना पावडर टाकावी.

## विशेष सूचना:

राज्यामध्ये तब्बल २ हजार ३८७ जनावरांना लम्पीचा लागण झाली आहे. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मोठा निर्णय घेण्यात आला आहे. लम्पीमुळे जनावराचा मृत्यू झाला असल्यास जनावराच्या मालकाला नुकसान भरपाई दिली जाईल. कृपया शेतकऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ७७७६८४५६३०)